 **फौ. कि. अर्ज क्र. ३१३/२०२५**

**<u>सत्यापण</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | – | **नामदेव गोविंद कणसे,** |
| **वय** | – | ४३ वर्षे, |
| **व्यवसाय** | – | सरकारी नोकरी, |
| **पत्ता** | – | विजयनगर, सांगली |

गैरअर्जदार अश्विनी कणसे ही माझी पत्नी आहे. दि. १४.०५.२०२४ रोजी रात्री ०७.४७ वाजण्याच्या सुमारास राममंदिर चौक, टायटन शोरूमसमोर सदरील घटना घडली. त्यावेळी मी व माझा मित्र सुरज गुरव हे श्री. छत्रपती संभाजी महाराज यांचा जन्ममहोत्सव पाहण्यासाठी गेलो असता त्या ठिकाणी माझी पत्नी अश्विनी कणसे व माझ्या दोन्ही मुली स्वरा व काव्या या तेथे आल्या. माझ्या पत्नीने पुन्हा पैशांची मागणी केली. मी त्यांना काही सांगायच्या आधीच त्यांनी माझी गळपट पकडून मला शिवीगाळ करू मारहाण केली. तसेच माझ्याकडील गाडी क्र. एम.एच.१०/बी.एल. ६१३० या गाडीची चावी काढून घेतली व त्या तेथून पळून गेल्या.

सदरील घटना ही सार्वजनिक घडल्याने मला अपमानास्पद वाटले होते. मी लगेचच पोलीस स्टेशन विश्रामबाग येथे तक्रार देण्यासाठी गेलो. पोलिसांनी सदर घटनेबाबत अदखलपात्र तक्रार क्र. २८५/२०२४ दाखल केली. पोलिसांनी पुढे काहीही कारवाई न

केल्याने मी प्रस्तुतचे प्रकरण न्यायालयात दाखल केले आहे.

फिर्यादी/साक्षीदाराची सही

(नामदेव गोविंद कणसे)

श्रवणोत्तर स्वीकृत,

२९/०९/२५

ठिकाण–सांगली

दिनांक–२९/०९/२०२५

**(रोहिणी सं. पाटील)**

**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (कोर्ट क्र. १)**

**सांगली.**